| | |
|---|---|
| MHAH210010832022 | दाखल केल्याचा दिनांक – ०६/१०/२०२२<br>नोंदणी केल्याचा दिनांक – ०६/१०/२०२२<br>निकालाचा दिनांक – २५/०५/२०२६<br>वर्ष महिना दिवस<br>कालावधी – ०३ ०७ १९ |

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्रमांक ०१, जामखेड,**

**ता. जामखेड, जि. अहिल्यानगर.**

**(पिठासीन अधिकारी – श्रीमती यु. ए. भोसले)**

फौजदारी किरकोळ अर्ज क्रमांक ३०५/२०२२ निशाणी क्रमांक ३१

**सुप्रिया स्वप्नील रणशिंग**
वयः २४ वर्षे, धंदाः घरकाम,
राहणार कुसडगाव,
ता. जामखेड, जि. अहमदनगर. ...**अर्जदार**

**विरुद्ध**

१. **स्वप्नील भाऊसाहेब रणशिंग**
वयः ३१ वर्षे, धंदाः नोकरी,
२. **शकुंतला भाऊसाहेब रणशिंग**
वयः ५३ वर्षे, धंदाः शेती,
३. **भाऊसाहेब कोंडीबा रणशिंग**
वयः ५५ वर्षे, धंदाः शेती,
४. **कोंडीबा धोंडीबा रणशिंग**
वयः ७० वर्षे, धंदाः शेती,
५. **केशर कोंडीबा रणशिंग**
वयः ६८ वर्षे, धंदाः शेती,
सर्व राहणार टाकळी कडेवळीत,
ता. श्रीगोंदा, जि. अ.नगर. ...**सामनेवाला**

अर्जः– कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम १२(१) अन्वये

---

**–: उपस्थिती :–**

अर्जदाराकरिता विधिज्ञ : श्री. एम. एन. नागरगोजे
सामनेवालाकरिता विधिज्ञ : श्री. पी. एन. ससाणे

---

**न्या य नि र्ण य**
**(घोषित तारीखः २५ मे, २०२६)**

प्रस्तुतचा अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम १२ नुसार दाखल केला आहे.

२. अर्जदार हिचे असे कथन आहे की, अर्जदार हिचे कथनानुसार तीचा सामनेवाला क्रमांक १ याच्यासोबत दिनांक २१.०१.२०२१ रोजी मौजे कुसडगाव, ता. जामखेड येथे विवाह झाला असुन त्यांच्यातील पती पत्नीचे नाते आजतागायत कायम आहेत. सामनेवाला क्रमांक २ व ३ हे अर्जदाराचे सासु–सासरे असुन सामनेवाला क्रमांक ४ व ५ हे अर्जदाराचे आजे–सासु–सासरे आहेत.

३. अर्जदाराचे पुढे असे कथन आहे की, विवाहानंतर तीला सामनेवाला यांनी एक महिना चांगले सांभाळले. त्यानंतर घरातील कामावरुन, आई–वडीलांना फोनवर जास्त बोलते म्हणुन सामनेवाला तीला त्रास देऊ लागले. सामनेवाला क्रमांक २ ही अर्जदाराला जेवण देत नसे. सतत सामनेवाला क्रमांक १ याला मारहाण करायला सांगून माहेरी हाकलून देत असे. अर्जदाराचे वडील सामनेवाला यांना समजावुन सांगण्यासाठी आल्यानंतर सामनेवाला क्रमांक २ ते ५ हे अर्जदार काम करत नाही, उलट बोलते, तीला येथे ठेवू नका असे म्हणत. सामनेवाला क्रमांक १ हा कोणत्याही कारणाशिवाय अर्जदारावर संशय घेत असे बहिणीला का फोन करते, दाजीला का बोलते इत्यादी कारणावरुन त्रास देत असे.

४. अर्जदाराचे पुढे असे कथन आहे की, सामनेवाला क्रमांक ४

अर्जदारास अपशकुनी आहे, तीचे वागणे चांगले नाही असे म्हणुन त्रास देण्यास प्रोत्साहन देत असे. सामनेवाला लग्नात मानपान केला नाही, हुंडा दिला नाही म्हणुन छळ करत असत. सामनेवाला क्रमांक १ हा 'मला तु पसंत नाहीस, मी घरच्यांच्या दबावाखाली लग्न केले आहे, मला सोडून जा' असे म्हणायचा. अर्जदाराने या सर्व बाबी तीच्या वडीलांना सांगितल्या तेव्हा वडीलांनी सामनेवाला यांना समजावण्याचा प्रयत्न केला. मात्र सामनेवाला यांच्यामध्ये कोणताही फरक पडला नाही. दिनांक १८.०२.२०२१ रोजी अर्जदाराला सामनेवाला यांनी मारहाण केली आणि दिनांक २०.०२.२०२१ रोजी अर्जदाराला हाकलून लावले. तेव्हापासून अर्जदार तीच्या माहेरी वडीलांकडे राहत आहे.

५. अर्जदाराचे पुढे असे कथन आहे की, अर्जदार माहेरी राहत असल्यापासुन सामनेवाला यांनी अर्जदाराची कोणतीही चौकशी केली नाही. तीच्या अन्न–वस्त्राची सोय केली नाही. सामनेवाला क्रमांक १ हा एरिगेशन खात्यामध्ये नोकरीला असुन त्याला महिन्याकाठी २५,०००/– पगार मिळतो. सामनेवाला यांना १६ एकर शेतजमिन असुन त्यामध्ये ऊस व लिंबुनी यांची पिके ते घेतात. अर्जदार ही पुर्णपणे सामनेवाला यांच्यावर अवलंबुन असुन वैद्यकीय खर्च म्हणुन तीला २०,०००/– रुपये तसेच मुलभुत गोष्टींसाठी दरमहा १०,०००/– रुपये पोटगी मिळावी अशी विनंती अर्जदार हिने केली आहे.

६. सामनेवाला यांना अर्जाची नोटीस बजावणी झाल्यानंतर त्यांनी हजर होऊन त्यांचे म्हणणे निशाणी क्रमांक १३ वर दाखल केले. त्यामध्ये त्यांनी अर्जदारासोबत असलेले त्यांचे नातेसंबंध मान्य केले आहेत, परंतू अर्जदाराने त्यांच्याविरुध्द केलेले इतर सर्व आरोप नाकारले आहेत. सामनेवाला यांच्या कथनानुसार प्रस्तुतचा अर्ज हा खोटा व कपोलकल्पीत असुन मनघडत दाखल केलेला आहे.

७. सामनेवाला यांच्या कथनानुसार विवाहाच्या वेळी सामनेवाला

क्रमांक १ सुशिक्षीत बेरोजगार होता व तो मजुरीचे काम करायचा. सामनेवाला यांचे आईवडील रोजगारासाठी मुंबई येथे राहत होते व त्याचे आज्ञी – आजोबा हे वयस्कर असल्यामुळे त्यांना चालता येत नाही. सामनेवाला पुढे कथन करतात की, अर्जदार ही सामनेवाला क्रमांक ४ व ५ यांना उलट बोलायची, घरातील कामे करायची नाही व घरातील व्यक्तिंचा अपमान करायची. सामनेवाला क्रमांक १ याने अर्जदार हिस फोन घेऊन दिला होता त्यामुळे फोनच्या कारणामुळे तीला कोणताही त्रास नसताना केवळ सामनेवाला यांना त्रास व्हावा म्हणुन सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार तीच्या बहिणीला व मेव्हण्याला सतत फोन करत असल्यामुळे ते कारण नसतांना संसारात ढवळा–ढवळ करु लागले. अर्जदार ही सामनेवाला क्रमांक ४ व ५ यांच्यापासुन वेगळे राहण्यासाठी सामनेवालास त्रास देऊ लागली.

८. सामनेवाला यांच्या कथनानुसार, अर्जदार ही स्वत: घर सोडून गेली आहे. दिनांक १८.०२.२०२१ रोजी तीला कधीही मारहाण केलेली नाही. अर्जदारास वारंवार नांदण्यास येण्याची विनंती करुनही ती आलेली नाही. 'तुमच्यावर खोट्या केसेस करीन' अशी तीने सामनेवाला यांना धमकी दिली आहे. सामनेवाला हा सुशिक्षीत बेरोजगार असुन त्याची आर्थिक परिस्थिती गरीबीची आहे. त्याच्याकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. सामनेवाला आजही अर्जदार हिस नांदवण्यास तयार आहे. सबब, अर्जदाराचा खोटा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

९. अर्जदाराने केलेली कथने, अर्जदार यांचे विधिज्ञ यांनी केलेला युक्तीवाद व कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम १२ अनुषंगाने महत्वपुर्ण बाबी इत्यादीवरुन, खालील वादप्रश्न माझे विचाराधीन झालेले आहेत. मी ते वादप्रश्न व त्यावरील माझे निष्कर्ष कारणमिमांसे सहित पुढील प्रमाणे नोंदविले आहेत.

| अ.क्र | विचाराधीन प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | सामनेवाला यांनी अर्जदार हिच्यावर कौटुंबिक हिंसाचार केला आहे असे अर्जदार सिध्द करते काय? | होकारार्थी |
| २. | अर्जदार ही कलम १८ प्रमाणे संरक्षण आदेश मिळण्यास पात्र आहे काय? | होकारार्थी |
| ३. | अर्जदार ही कलम १९ प्रमाणे निवासी आदेश मिळण्यास पात्र आहे काय? | नकारार्थी |
| ४. | अर्जदार ही कलम २० नुसार मागणीप्रमाणे पोटगी मिळण्यास पात्र आहे काय? | अंशत: होकारार्थी |
| ५. | अर्जदार ही कलम २२ प्रमाणे नुकसान भरपाई आदेश मिळणेस पात्र असल्याचे सिध्द करते काय? | नकारार्थी |
| ६. | आदेश काय? | अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो. |

:: **<u>कारणमिमांसा</u>** ::

**<u>विचाराधीन क्रमांक ०१ साठी</u> :-**

१०. अर्जदाराच्या एकंदरीत कथनावरुन तसेच अभिलेखावर सादर करण्यात आलेल्या मौखिक व कागदोपत्री पुराव्यावरुन अर्जदार ही सामनेवाला क्रमांक १ याची पत्नी असल्याचे स्पष्ट होते. प्रस्तुत प्रकरणामध्ये अर्जदार हीने दाखल केलेल्या पुराव्याचे शपथपत्रात विवाहानंतर तिला सातत्याने मानसिक, शारीरिक आणि भावनिक स्वरूपाचा छळ सहन करावा लागल्याचे नमूद केले आहे. विवाहानंतर सुरुवातीचे काही दिवस सौख्यपूर्ण गेले, परंतु त्यानंतर सामनेवाला यांचे वर्तन बदलले. अर्जदार हिने नमूद केल्याप्रमाणे, सामनेवाला क्रमांक १ ते ५ यांनी वेळोवेळी तीच्यावर शिवीगाळ, मारहाण करणे, उपाशीपोटी ठेवणे, तीचा अपमान करणे इत्यादी प्रकारे छळ केला असे दिसुन येते.

११. अर्जदाराच्या उलटतपासादरम्यान तीने असे मान्य व कबुल केले आहे की, सामनेवाला याच्याकडे शेतजमिन असल्याची माहिती झाल्यावर तीचे लग्न जमवण्यात आले होते. त्यावेळी सामनेवाला यास २५ एकर शेतजमिन असुन तो पाटबंधारे विभागामध्ये नोकरीला असल्याबाबत तीच्या आई–वडीलांनी चौकशी केली होती. साक्षीदार पुढे कबुल करते की, सामनेवाला यांच्या शेतजमिनीचे व त्याच्या नोकरीबाबतची कागदपत्रे तीने अभिलेखावर दाखल केलेली नाही. पुढे ती कबुल करते की, सामनेवाला क्रमांक ४ व ५ यांची वय अनुक्रमे ८५ व ७८ वर्ष आहेत. विवाहानंतर ती सामनेवाला क्रमांक १ तसेच सामनेवाला क्रमांक ४ व ५ यांच्यासोबत राहत होती. सामनेवाला क्रमांक ४ व ५ यांना कोणताही कामधंदा नाही. पुढे ती कबुल करते की, सामनेवाला क्रमांक १ हा तीला तीच्या मताप्रमाणे वागु देत नव्हता. साक्षीदार पुढे कबुल करते की, सामनेवाला याने केवळ छळ करुन तीला हाकलून दिले याव्यतिरीक्त त्याने काहीही केले नाही.

१२. अभिलेखावर निशाणी २८ वर सामनेवाला क्रमांक १ याचे पुराव्याचे शपथपत्र दाखल केले असुन त्याने त्याच्या लेखी म्हणण्यातील सर्व भाग पुनरुल्लेखीत केला आहे. सदर साक्षीदाराने त्याच्या उलटतपासादरम्यान असे कबुल केले आहे की, सामनेवाला क्रमांक ४ च्या नावे मौजे टाकळी कडेवळीत येथे ६ हेक्टर ४७ आर जमिन आहे.

१३. अभिलेखावरील सर्व पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, अर्जदार ही दिनांक २०.०२.२०२१ पासुन तीच्या माहेरी राहत असल्याबाबतची बाब सामनेवाला यांने मान्य केली आहे. अर्जदार व सामनेवाला यांच्या पुराव्यावरुन असे दिसुन येते की, अर्जदाराला कौटूंबिक हिंसाचाराच्या कक्षेत बसतील अशा हिंसाचाराचा सामना करावा लागला आहे.

१४. कौटुंबिक हिंसाचाराचा अर्थ केवळ शारीरिक मारहाणीपुरता मर्यादित नसून त्यामध्ये मानसिक, आर्थिक, लैंगिक व भावनिक त्रासाचाही

समावेश होतो, हे कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम ३ मध्ये स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे. निशाणी ७ वरील संरक्षण अधिकारी यांचेमार्फत दाखल केलेला कौटूंबिक हिंसाचार घटना अहवाल दाखल केला आहे. त्याचे अवलोकनावरुन असे दिसून येते की, सामनेवाला अर्जदारास मारहाण करत असत तसेच तीला उपाशीपोटी ठेऊन मारहाण करत असल्याचा उल्लेख आलेला आहे. अर्जदार हिच्या निशाणी १५ वरील शपथपत्रावरून असे दिसते की, ती मानसिकदृष्ट्या खचली होती, तिला स्वतंत्रपणे निर्णय घेण्याचा अधिकार नाकारला जात होता, तिच्या मूलभूत गरजांकडे दुर्लक्ष करण्यात येत होते, हे सर्व 'कौटुंबिक हिंसाचाराच्या' परिभाषेत बसते. न्यायालयीन दृष्टिकोनातून पाहता, स्त्रीचा सन्मान, प्रतिष्ठा आणि तिचे मानसिक स्वास्थ्य सुरक्षित ठेवणे हे प्राथमिक दायित्व आहे. त्यामुळे अशा प्रकारचा सातत्यपूर्ण छळ अर्जदार हिच्यावर सामनेवाला क्रमांक १ ते ५ यांनी केल्याचे सिद्ध होते. त्यामुळे, मी वादप्रश्न क्रमांक **०१ चे उत्तर होकारार्थी नोंदविते**.

<u>वादप्रश्न क्रमांक ०२ साठी</u>:–

१५. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम १८ हे स्पष्टपणे नमूद करते की, "Domestic violence has taken place or is likely to take place". यामधून, न्यायालयास केवळ 'हिंसाचार झाला आहे' एवढेच नव्हे, तर 'होऊ शकतो' अशी शक्यता असेल तरीही संरक्षण आदेश पारीत करण्याचे अधिकार प्रदान केले आहेत. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ मधील कलम १८ मध्ये स्त्रीस तिच्या शारीरिक, मानसिक व भावनिक संरक्षणासाठी आवश्यक तो प्रतिबंधात्मक आदेश देण्याची तरतूद आहे.

१६. उपरोक्त चर्चेवरुन तसेच वादप्रश्न क्रमांक १ च्या होकारार्थी निष्कर्षावरुन ती कौटुंबिक हिंसाचाराची बळी असल्याची बाब तीने सिध्द केली आहे. अर्जदाराच्या पुराव्यावरुन सामनेवाला यांनी तीला सासरच्या घरातून

हाकलून दिले आहे. तसेच तीच्या माहेरी येऊन तीला उचलुन घेऊन जाण्याचा प्रयत्न केला आहे. अर्जदार हिने तिच्या शपथपत्रात सामनेवाला यांनी तिला मारहाण करुन घरातून हाकलून दिल्याची बाब कथन केली आहे. यावरुन सामनेवाला यांनी सासरी तसेच ती राहत असलेल्या ठिकाणी येऊन देखील हिंसाचार केला असल्याचा तोंडी पुरावा दाखल केलेला असल्यामुळे सर्व परिस्थिती व निवेदने विचारात घेतल्यास, अर्जदार ही कलम १८ अन्वये संरक्षण आदेश मिळविण्यास अर्जदार पात्र ठरते. त्यामुळे, मी वादप्रश्न क्रमांक **०२ चे उत्तर होकारार्थी नोंदविते.**

**वादप्रश्न क्रमांक ०३ साठी:–**

१७. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम १९ मध्ये महिला जिच्यावर कौटुंबिक हिंसाचार झाला आहे, तिच्यासाठी सुरक्षित वास्तव्याची तरतूद केली आहे. यामध्ये तिला सासरीच राहण्याची मुभा, किंवा स्वतंत्र राहण्यासाठी पर्यायी व्यवस्था, तसेच तिच्या स्त्रीधनाचा परतावा यांचा समावेश होतो. अर्जदार ही जाबदेणार क्रमांक ०१ याची पत्नी असून, ती गैरअर्जदारांसोबत संयुक्त कुटुंबात राहत होती. तिच्या कथनानुसार, तिला गैरअर्जदारांनी घराबाहेर हाकलले. याउलट, सामनेवाला साक्षीदार क्रमांक ०१ यांनी त्यांच्या पुराव्यामध्ये असे कथन केला आहे की, अर्जदार स्वतःहून घर सोडून गेली आणि तिने नांदण्यास नकार दिला. अर्जदार ही सध्या तीच्या माहेरी राहत आहे हे अर्जदाराच्या तसेच सामनेवालातर्फे साक्षीदार क्रमांक ०१ यांच्या पुराव्यानुसार स्पष्ट होते. मात्र सामनेवाला याचे निवासी घर असल्याबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा अर्जदाराने दाखल केलेला नाही. ती सामनेवाला याच्यासोबत एकत्रित कुटूंबात कोणत्या घरात वास्तव्यास होती याबाबतचा देखील पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. तसेच अर्जदार भाड्याच्या घरात राहत असल्याबाबतचा कोणताही पुरावा अर्जदाराने अभिलेखावर दाखल केलेला नसल्यामुळे निवासी आदेश मिळणेबाबत अर्जदार पात्र ठरत नाही. त्यामुळे, मी

वादप्रश्न क्रमांक **०३ चे उत्तर नकारार्थी नोंदविते.**

**<u>वादप्रश्न क्रमांक ०४ साठी</u> :-**

१८. अर्जदाराने ती कौटूंबिक हिंसाचाराची बळी असल्याची बाब सिध्द केली असल्याने कौटूंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण कलम २० अंतर्गत अर्जदारास तिच्या उदरनिर्वाहासाठी आवश्यक ती आर्थिक मदत मिळण्याचा अधिकार आहे. अर्जदार हिने स्पष्टपणे नमूद केले आहे की, तीला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. ती पूर्णतः पतीवर म्हणजेच सामनेवाला क्रमांक ०१ याच्यावर अवलंबून आहे. तिच्या नावावर कोणतीही स्थावर मालमत्ता अथवा उत्पन्नाचे स्त्रोत नसल्याचे तीने कथन केले आहे.

१९. अभिलेखावरील पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अर्जदारामार्फत निशाणी ३ सोबत मौजे टाकळी कडेवळीत, ता. श्रीगोंदा येथील गट क्रमांक २६/६ चा सातबारा उतारा दाखल केला आहे. त्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदर सातबारा हा भोगवटादार वर्ग २ चा असुन भोगवटादाराचे नाव सदर कोंडीबा धोंडीबा रणशिंग याचे नाव नमुद आहे. सदर गटामध्ये त्याचे ४ हेक्टर ७९ आर क्षेत्र असुन त्याचा आकार ५.९२ पै. असा आहे. यावरुन असे दिसुन येते की, सदरील शेतजमिन ही सामनेवाला क्रमांक ४ याचे नावे असुन ती सामनेवाला यांची एकत्रित कुटूंबाची मिळकत आहे. यावरुन सदर मिळकतीमध्ये सामनेवाला क्रमांक १ याचा अविभाज्य हिस्सा असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. सामनेवाला क्रमांक १ हा त्याच्या आज्ञी-आजोबा सोबत म्हणजेच सामनेवाला क्रमांक ४ व ५ यांच्यासोबत राहतो. अर्जदाराच्या पुराव्यावरुन असे दिसुन येते की, सामनेवाला हा पाटबंधारे खात्यामध्ये नोकरीस आहे. मात्र त्याबाबतचा कोणताही लेखी पुरावा अर्जदाराने दाखल केलेला नाही. याउलट सामनेवाला याच्या म्हणण्यानुसार तो बेरोजगार असुन मोलमजुरी करतो.

२०. अभिलेखावरुन अर्जदार ही सामनेवाला क्रमांक १ यांची विवाहाची पत्नी असुन त्यांच्यातील नातेसंबंध आजतागायत कायम असल्याची बाब सिध्द करण्यात आलेली आहे. पत्नीच्या पालनपोषणाची जबाबदारी ही तीच्या पतीची

असल्यामुळे सामनेवाला क्रमांक १ याने अर्जदाराच्या औषधोपचार, अन्नधान्य व वस्त्र इत्यादी दैनंदीन खर्च भागविण्यासाठी अर्थसहाय्य देणे आवश्यक आहे. सामनेवाला यांच्या उत्पन्नासंबंधी कोणतेही स्पष्ट दस्तऐवज सादर केले नसले, तरी ते सक्षम वयाचे, काम करू शकणारे व शारीरिकदृष्ट्या सुदृढ आहेत, हे गृहित धरता, त्यांच्याकडून किमान जीवनावश्यक खर्च भागविणे अपेक्षित आहे. तसेच, सामनेवाला क्रमांक १, वर चर्चा केल्याप्रमाणे शेतीच्या अथवा मोलमजुरी करुन उत्पन्न मिळविण्यास सक्षम आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या **अंजू गर्ग विरुद्ध दीपक गर्ग** (फौजदारी अपील क्रमांक १६९३/२०२२) या खटल्यातील निकालात असे नमूद केले आहे की, सुदृढ शरीरयष्टीचा पती नैतिक मार्गाने कमाई करून पत्नी आणि मुलांचे पालनपोषण करण्यास बंधनकारक आहे. त्यामुळे, सामनेवाला क्रमांक ०१ याला उत्पन्नाचे साधन नाही असा बचाव घेता येणार नाही. सामनेवाला क्रमांक ०१ हा अर्जदाराचा पती असून तीच्या उदरनिर्वाहाचा खर्च पुरविणे हे त्याचे कायदेशीर व नैतिक कर्तव्य आहे.

२१. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ च्या कलम २०(१)(ड) अन्वये, अर्जदाराला तिच्या दैनंदिन गरजा आणि व पालनपोषणासाठी आर्थिक मदत मिळण्यास ती पात्र आहे. अर्जदाराच्या राहणीमानाचा आणि तिच्या प्राथमिक गरजांचा विचार करता, अर्जदार हिस स्वत:करीता दरमहा रक्कम रुपये ४,०००/– पोटगीची आवश्यकता आहे. अर्ज दाखल तारखेपासून पोटगीची रक्कम अर्जदारास मिळणेस पात्र असल्याचे दिसून येते. करीता वरीलप्रमाणे आदेश पारीत करणे न्यायोचित ठरेल. म्हणुन मुद्दा क्रमांक **४ साठी अंशत: होकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.**

**<u>वादप्रश्न क्रमांक ०५ साठी</u>:–**

२२. कलम २२ मध्ये अशा महिलेस मानसिक त्रास, शारीरिक वेदना व सामाजिक अपमान यांबद्दल नुकसान भरपाई देण्याची तरतूद आहे, प्रस्तुत प्रकरणात, त्याबाबत अर्जदाराने कोणतीही स्पष्ट मागणी केली नसल्यामुळे वा वैद्यकीय मदत म्हणुन २०,०००/– रुपयांची मागणी केल्यामुळे अर्जदार ही

नुकसान भरपाईस अपात्र असल्याचे दिसून येते. वरील सर्व बाबींचा विचार करता, मी वादप्रश्न क्रमांक **५ चे उत्तर नकारार्थी** ठरवून वादप्रश्न क्रमांक ६ साठी खालील आदेश पारीत करत आहे.

**<u>आदेश</u>**

| | |
|---|---|
| १. | प्रस्तुतचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे. |
| २. | कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम,२००५ चे कलम १८ अन्वये यातील सामनेवाला यांना अशी ताकीद देण्यात येते की, त्यांनी अर्जदारावर कोणत्याही प्रकारचा कौटुंबिक हिंसाचार करु नये. |
| ३. | कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम,२००५ चे कलम २०(१)(ड) अन्वये, यातील सामनेवाला क्रमांक १ याने अर्जदार क्रमांक १ हिस दरमहा रक्कम रुपये ४,०००/- (रुपये चार हजार मात्र) प्रस्तुतचा अर्ज दाखल तारखेपासून, पोटगी म्हणून दयावी. |
| ४. | प्रस्तुत आदेशाची प्रमाणित प्रत उभय पक्षकारांना विनामुल्य देण्यात यावी. |
| ५. | सदर आदेशाची प्रत पोलीस निरीक्षक, जामखेड पोलीस स्टेशन व संरक्षण अधिकारी, जामखेड यांना पाठवण्यात यावी. |
| | (आदेश खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला) |

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by
UMA KAKASAHEB
GANGANE
Date: 2026.05.25
17:54:07 +0530

**( यु. ए. भोसले )**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
**<u>जामखेड</u>**

दिनांक- २५/०५/२०२६
स्थळ - जामखेड